# ब्लॅक फॉरेस्ट



साल 1956, क्लॉस आणि अर्सला ड्रुबा (Drubba) ही जोडी जर्मनीतल्या छोट्याश्या टिटीसी टाऊनमधे राहण्यासाठी आली. तिथेच असलेल्या हान्सेन टिटीसी हॉटेलमधे ते काम करत असताना, त्या शांत आणि निसर्गरम्य ठिकाणी, त्यांनी खेळणी आणि सुवीनिअर्सचं एक छोटंसं दुकान सुरु केलं. जवळच असणाऱ्या, नयनरम्य अशा टिटीसी लेकवर, बोट राईडसाठी सुद्धा ते आता लोकांना घेऊन जाऊ लागले. लेकच्या आजूबाजूचा भाग अतिशय सुंदर होता. चारही बाजूंनी दाट जंगलानी आणि डोंगरांनी वेढलेला तो परीसर, स्वित्झर्लंडला जाणाऱ्या रस्त्यावरच असल्याने, अगदी मोक्याच्या ठिकाणी होता, त्यामुळे निसर्गाच वरदान लाभलेल्या या भागात, जाणारे येणारे लोक, तास-दोन तास का होईना, थांबू लागले. पर्यटनाला चालना मिळू लागली. ड्रुबा दाम्पत्याने लवकरच त्यांच्या छोट्याशा दुकानाचं रूपांतर, एका रेस्टॉरंटमध्ये केले आणि काही काळानंतर हॉटेल व्यवसाय पण सुरू केला. अशाप्रकारे या भागातील इतर अनेक व्यवसायिकांच्या उद्योगातसुद्धा प्रगती व्हायला लागली. हॉटेल्स, दुकानं, रेस्टॉरंट्स आणि इतर अनेक सोयीसुविधांनी हा भाग परिपूर्ण होऊ लागला. आज, जर्मनीहून स्विझर्लंडला जाताना, वाटेत लागणारा हा एक महत्त्वाचा लॅंडमार्क आहे. जर्मनीच्या या जगप्रसिद्ध परिसराला 'ब्लॅक फॉरेस्ट' असे म्हणतात.

# ब्लॅक फॉरेस्ट

ब्लॅक फॉरेस्ट म्हणजे, जर्मनीच्या दक्षिणेकडे असणाऱ्या नद्या, लेक, डोंगर, बर्फ आणि काळसर हिरव्या गर्द झाडींचा, हा अफलातून सुंदर असा प्रदेश आहे. ही पर्वतरांग दाट झाडांनी, जवळजवळ संपूर्णपणे व्यापलेली आहे. ह्याचा अधिकतम भाग, हा, -हाईन नदीच्या खोऱ्यात असून, आकाराने आयताकृती आहे. 160 किलो मीटर लांबी व 50 किलो मीटर रुंदी असणारं, ब्लॅक फॉरेस्ट, हे बहुतांशी स्पृस, पाईन आणि फर या झाडांनी बनलेलं आहे. टुरिझम, वुड कार्विंग, कुक्कू (kukkoo) क्लॉक मेकिंग हे इथले प्रमुख उद्योग. वुड कार्विंग, ही इथली पारंपारिक कॉटेज इंडस्ट्री आहे, तर या परिसरातील घरांचे डिझाईन असणारं, कुकू क्लॉक हे ह्यांचं जगप्रसिद्ध वैशिष्ट्यच. जवळजवळ तीनशे वर्षांची परंपरा असणाऱ्या या क्लॉकची रचना अशी मजेदार असते, की प्रत्येक तासाला, त्या घड्याळाच्या छोट्याशा खिडकीतून, एक चिमुकला पक्षी बाहेर येऊन, कुक कुक असा आवाज करतो. जगभरात लोकप्रियता मिळवलेलं कुक्कू क्लॉक, हे आज ब्लॅक फॉरेस्टची ओळख बनलं आहे. कुक्कू क्लॉकप्रमाणेच, इथली लाकडापासून बनवलेली खेळणी, फर्निचर तसंच या रिजनची खासियत असणारा ब्लॅक फॉरेस्ट केकही अतिशय प्रसिद्ध आहे.

पर्यटकांच्या दृष्टीने आज लोकप्रिय असलेल ब्लॅक फॉरेस्ट, तसं अनेक वर्षांपासून महत्वाचं मानलं जातं. रोमन लोकं त्याला 'सिल्वा निग्रा' असं म्हणत असत. या फॉरेस्टमधे मुबलक वनसंपदा आहे. बहुतांश झाडं, ही स्पृस, पाइन आणि फर यांसारखी सूचिपर्णी असून, एकमेकांना अगदी खेटून उभी आहेत. त्यामुळे पूर्वी, सूर्यप्रकाश सुद्धा फॉरेस्टच्या आतपर्यंत पोहोचू शकत नसे. अशा या अंधाऱ्या आणि गूढ समजल्या जाणाऱ्या, ब्लॅक फॉरेस्टमध्ये खनिज्यही सापडल्यामुळे, पुढे मायनींगही सुरू झालं. फॉरेस्टला वरचेवर वादळाचे तडाखे बसल्याने स्पृस सारखी काही झाडं टिकू शकली नाहीत, परंतु त्यांच्या वाढीचा वेग इतका प्रचंड आहे, की चार-पाच वर्षांतच, नव्या झाडांनी जंगल परत पूर्ववत होतं. ब्लॅक फॉरेस्ट रिजन मधली छोटी छोटी गावं आणि लेक्स अतिशय सुंदर आहेत. जर्मन ही इथली मूळ भाषा असली, तरी येथे आलेमिनिक आणि स्वाबिअन, अशा बोली सुद्धा बोलल्या जातात. माऊंटन बाइकिंग, स्किईंग, क्रॉस कंट्री सायकलिंग, कॅम्पिंग, हायकिंग, माऊंटेनिअरिंग हे इथले आवडते खेळ. मायनिंग, लाकूड उद्योग आणि आता टुरिझम असे टप्पे पार करणारा ब्लॅक फॉरेस्ट चा रिजन, हा येथील निसर्ग सौंदर्य व शांत वातावरण, यासाठी अधिक ओळखला जातो. त्यामुळे जर्मनीहून स्वित्झर्लंड कडे जाताना, ब्लॅक फॉरेस्टचा स्टॉप चुकवू नये असाच आणि अशा ह्या जग प्रसिद्ध, नयनरम्य, अफलातून सौंदर्यानी नटलेल्या आणि शांतीचा एक अदभूत अनुभव देणाऱ्या, स्वर्गीय ब्लॅक फ़ॉरेस्ट मध्ये, खुसखुशीत भेळपुरी, कॉर्न भेळ, रगडा पॅटिस, कटलेट, बर्गर, गरमा गरम फ्रेंच फ़्राइज, मराठी मसाला भात, फ्रेश सलाड, पंजाबी लस्सी, फ्रुट पंच आणि जग प्रसिद्ध ब्लॅक फ़ॉरेस्ट केक सह मँगो हॉलिडेज नी केलेलं तुमचं स्वागत आणि आदरातिथ्य, म्हणजे आनंदाचा पूर्ण विराम चं........................
क्रमश :